# राष्ट्रीय आरोग्य अभियान
## तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, भद्रावती
## जाहिरात क्र. १ (सन २०२३-२४) (दि. ३/१०/२०२३)

**तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, भद्रावती, जि. चंद्रपूर अंतर्गत राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये तालुक्यात राबविण्यात येणा-या खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी तत्वावर रिक्त पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.**

| Sr. No. | Name of Post | No. of Posts | Required Category | Qualification | Remuneration Rs. (Per Month Consolidated) | Place of Post |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Staff Nurse | 1 | ST - 1 | G.N.M./B.Sc. Nursing | 20000/- | UPHC Bhadrawati |

**अटी व शर्ती -**

१) वरील सर्व पदे ही कंत्राटी स्वरुपाची एकत्रीत मानधनाची असुन मा. आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार व राष्ट्रीय आरोग्य अभियान पुढे सुरु राहिल्यास पुनर्नियुक्तीव्दारे वाढविण्याची कार्यवाही केली जाईल.

२) वरील नमुद सर्व पदे ही राज्यशासनाची पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क वा दावा राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही.

३) केंद्र/राज्य शासनाने संबंधित पदे नामंजूर केल्यास उमेदवाराची सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल व याबाबत कुठलीही तक्रार व ग-हाणी ऐकुण घेण्यात येणार नाही.

४) उच्च शैक्षणिक अर्हता व अनुभव असलेल्या उमेदवारांस निवड प्रक्रियेमध्ये प्राधान्य दिले जाईल. कामाचा अनुभव हा शासकिय/निमशासकिय/स्थानिक स्वराज्य संस्थांचाच ग्राहय धरण्यात येईल. तसेच संगणक अहर्ता आवश्यक असलेल्या पदाकरीता उमेदवारांची मराठी व इंग्रजी टायपींगची संगणक चाचणी घेण्यात येईल.

५) अ.क्र. १० चे स्टॉफ नर्स या पदाकरीता B.Sc. Nursing/P.B.B.Sc च्या उमेदवारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

६) **जाहिरात प्रसिध्द झाली त्या दिवशीची वयोमर्यादा :-** १) वयोमर्यादा राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील,

७) स्टाफ नर्स पदांकरीता तत्सम कौन्सिलचे वैध नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारांस अपात्र ठरविण्यांत येईल.

८) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

९) सदर रिक्त पदांच्या संख्येत तसेच पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहे.

१०) **अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव व सामाजिक आरक्षणानुसार सदर पदाकरीता नमुद प्रवर्ग (जातीचा प्रवर्ग) अर्जामध्ये स्पष्टपणे नमुद करावा.**

११) सदर रिक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संख्येत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरीता असलेली पात्रता (अर्हता व अनुभव) आवश्यकतेनुसार शिथील करण्यात येईल. तसेच राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेता प्रतिक्षा यादीतील उमेदवाराला खुल्या प्रवर्गात तात्पुरती नेमणूक देण्यात येईल.

१२) राखीव संवर्गातून अर्ज करण्या-या उमेदवारांनी त्या संवर्गाची वैध प्रमाणपत्रे (Caste Certificate/Validity Certificate) जोडणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही.

➢ **अर्जासोबत सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती -**

१) पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक (Marksheet) तसेच ईतर आवश्यक प्रमाणपत्रे

२) शाळा सोडल्याचा/जन्मतारखेचा दाखला. ३) अनुभवाची प्रमाणपत्रे. ४) जात प्रमाणपत्राची अद्यावत प्रत.

५) तांत्रिक पदांकरीता तत्सम कौन्सिलचे वैध नोंदणी प्रमाणपत्र.

➢ **अर्ज करण्याची पध्दत -**

१) इच्छुक उमेदवरांनी यासोबत देण्यात आलेल्या अर्जाच्या नमुन्यात A4 Size आकाराच्या पांढ-या जाड कागदावर प्रिंट करुन सुवाच्य अक्षरात भरलेला अर्ज आवश्यक सर्व कागदपत्रांसह सादर करावा. सदर अर्जचा नमुना **तालुका आरोग्य अधिकारी कार्यलय,भद्रावती** येथे मिळणार.

२) राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी रु. १००/- चे राष्ट्रियकृत बँकेचे डिडि अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. सदर डी.डी. मागे उमेदवाराने स्वतःचे नाव व अर्ज केलेल्या पदाचे नाव लिहावे.

३) सदर डी.डी. (Demand Draft) **Taluka Medical Officer, Bhadrawati** या नावाने काढावा.

४) उमेदवारांनी उपरोक्त प्रमाणे संपूर्ण दस्ताऐवज लिफाफयामध्ये सिलबंद करुन अर्ज करीत असलेल्या पदाचे नाव लिफाप्यावर नमुद करुन सादर करावे.

५) उमेदवारांनी आपले अर्ज **तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, भद्रावती, जि. चंद्रपूर येथे १६/१०/२०२३ ते दि.२५/१०/२०२३ सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत** कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळुन पोस्टाव्दारे किंवा व्यक्तीशः सादर करावे. त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज स्विकृत करण्यात येणार नाही, यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

➢ **खालील प्रमाणे उणिवा असलेले अर्ज अपात्र करण्यात येतील -**

१) विहित पात्रता धारण न करणा-या उमेदवारांचे अर्ज.

२) शासकिय कर्मचारी/एनएचएम कर्मचारी यांचेवर पुर्वीच्या कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकिय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद असलेल्या उमेदवारांचे अर्ज.

३) विहित नमुन्यात नसलेले किंवा योग्य प्रकारे न भरलेले अर्ज.

४) आवश्यक मजकुर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेला अर्ज, खाडाखोड केलेला अर्ज.

५) अर्जावर स्वाक्षरी नसलेले, आवश्यक गुणपत्रकांच्या व प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती नसलेले, आवश्यक शुल्काचे डिडि न जोडलेले अगर तत्सम माहिती योग्य रित्या न दर्शविलेले, इत्यादी अर्ज.

उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र ठरणा-या उमेदवारांकरीताच राबविण्यात येईल. पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच सदर पदभरती संदर्भातील वेळोवेळी प्रकाशित करण्यात येणा-या सुचना फक्त जिल्हा परिषद चंद्रपूर च्या संकेतस्थळावर (वेबसाईडवर) **(https://zpchandrapur.co.in/)** तसेच अर्ज केलेल्या ठिकाणी नोटीस बोर्डवर प्रकाशित करण्यात येईल. याची वेगळी सुचना उमेदवारांना दिली जाणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| **अध्यक्ष** | **सदस्य सचिव** | **सदस्य** |
|---|---|---|
| जि.ए.आ.व कु.क.सोसायटी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | तालुका आरोग्य अधिकारी तालुका कार्यालय | मुख्याधिकारी नगर परिषद |